# वाशिम जिल्हा पोलीस गॅझेट
# अंक १८ वा
# दिनांक -३०/०४/२०१८ ते ०५/०५/२०१८
# पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम.
जावक क्रमांक 5560 दिनांक 2 9 JUN 2018

---

## भाग- १ :- बदली/पदोन्नती/नेमणुक :-

### बदली :-

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/अटॅच/पोना-१०३७ पोशि-१३१०/३३०३/२०१८ वाशिम दिनांक ४/५/२०१८ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना प्रशासकीय कारणास्तव पुढील आदेशापर्यंत पो.मु.वाशिम येथे अटॅच करण्यात येत आहे.

१) पोना/१०३७ राजेश बायस्कर नेमणुक पो.स्टे.वाशिम शहर.
२) पोशि/१३१० स्वप्नील शेळके नेमणुक स्थागुशा वाशिम .

### नेमणुक :-

271015

क्रमांक पोअवा/पशा-१/अकंपा-नेमणुक/लिपीक-नि-टंकलेखक/२०१८/३०८० वाशिम दिनांक ४/५/२०१८ अन्वये पोलीस अधिक्षक यांचे आस्थापनेवरील लिपीक वर्ग-३ या संवर्गातील रिक्त असलेल्या पदावर श्रीमती रंजीता पंडीत चव्हाण यांची अनुकंपा तत्वानुसार लिपीक-नि-टंकलेखक पदी वेतन बॅन्ड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे वेतन रुपये १९००/- मध्ये कर्तव्यावर हजर झाल्याच्या दिनांकापासुन सर्व अटी व शर्तीचे आधिन राहुन तात्पुरत्या व स्थानापन्न स्वरुपात नेमणुक करण्यात येत आहे.

## भाग-२ रजा:-

आदेश क्रमांक पोअवा/विचौ.लि/पोना-८२१/गैरहजर/३०९७/२०१८ वाशिम दिनांक ५/५/२०१८ अन्वये पोना/८२१ उस्मान लल्लु चौधरी नेमणुक पो.स्टे.धनज हे दिनांक ५/३/२०१८ रोजी पासुन किरकोळ रजेवरुन गैरहजर होते ते आज दिनांक ५/५/२०१८ रोजी कर्तव्यावर हजर झाले असुन त्यांचा दि.५/३/२०१८ ते ५/५/२०१८ पावेतो ६२ दिवसाचा गैरहजर कालावधिची परावर्तीत रजा मंजुर करण्यात येत आहे.

क्रमांक पोअवा/आली-२/निवृत्त पुर्व रजा/पो.कर्म/३०८९/२०१८ वाशिम दिनांक ५/५/२०१८ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याने त्यांना त्यांचे विनंतीनुसार महाराष्ट्र नागरी सेवा रजा (नियम) १९८१ नियम ६६(१) अन्वये रजेवर सोडल्याचे दिनांकापासुन त्यांचे नावासमोर दर्शविले प्रमाणे देय अर्धवेतनी रजेमधुन सेवानिवृत्ती पुर्व रजा मंजुर करण्यात येत आहे. तसेच त्यांना सदरची रजा उपभोगण्याची परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचारी नांव, पदनाम व ब.नं. | नेमणुकीचे ठिकाण | सेवानिवृत्ती दिनांक | मंजुर रजा |
|---|---|---|---|---|
| १ | सपोउपनि/३५० साहेबराव सकरु रोठोड | वाशिम शहर | ३१/०८/२०१८ | १२० दिवस |
| २ | सपोउपनि/३७३ रमेश रुस्तमराव सरनाईक | पो.मु.वाशिम | ३०/०६/२०१८ | १२० दिवस |
| ३ | सपोउपनि/४८७ देविदास गणपत गव्हाळे | शिरपुर | ३०/०९/२०१८ | १८० दिवस |
| ४ | सपोउपनि/३९७ सुधाकर देवकते | नियंत्रण कक्ष वाशिम | ३१/०८/२०१८ | १२० दिवस |
| ५ | सपोउपनि/३९३ रामदास इंगळे | वाशिम ग्रामीण | ३१/११/२०१८ | १८० दिवस |

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/अरवरो/पोलीस अधिकारी/२०१८/३०६२ वाशिम दिनांक ४/५/२०१८ अन्वये खालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजा व १५ दिवसांचे रजा रोखीकरण मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी नांव नेमणुक | रजेचा तपशिल | मुळ वेतन व ग्रेड पे |
|---|---|---|---|
| १ | पोनि गजानन गुल्हाने पो.स्टे.कारंजा ग्रा. | १५ दिवस अर्जित रजा व १५ दिवस रजा रोखीकरण | २१०२०+५०००/- |
| २ | सपोनि अमर चोरे पो.स्टे.कारंजा ग्रा. | ३० दिवस अर्जित रजा व १५ दिवस रजा रोखीकरण | १५१२०+४४००/- |
| ३ | पोउपनि रामबाबु सरोदे पो.स्टे.कारंजा ग्रामीण | ३० दिवस अर्जित रजा व १५ दिवस रजा रोखीकरण | १२९३०+४३००/- |
| ४ | पोउपनि असदउल्लाखान पठाण पो.स्टे.मंगरुळपिर | १५ दिवस अर्जित रजा व १५ दिवस रजा रोखीकरण | १४७५०+४३००/- |
| ५ | पोउपनि राजाभाऊ काटकाडे पो.स्टे.मानोरा | १५ दिवस अर्जित रजा व १५ दिवस रजा रोखीकरण | ११४५०+४३०० |
| ६ | पोउपनि भगवान पायघन पो.स्टे.कारंजा शहर | ३० दिवस अर्जित रजा व १५ दिवस रजा रोखीकरण | ११४५०+४३०० |
| ७ | पोउपनि धनराज कुळमेथे श्वान पथ्‌क वाशिम | १५ दिवस अर्जित रजा व १५ दिवस रजा रोखीकरण | १३३८०+४३०० |

क्रमांक पोअवा/आली-४/पोहवा/बियंचा शेख//बिसंवि/कर्मचारी /सिक रजा/परावर्तीत/२०१८/३०९५ वाशिम दिनांक ५/५/२०१८ अन्वये खालील नमुद पोलीस बिनतारी संदेश विभाग वाशिम येथील कर्मचारी हे सिक रजेवर होते.त्यांनी सादर केलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रा वरुन त्यांचे सिक रजेचा कालावधि परावर्तीत रजा म्हणुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | कर्मचारी नांव | नेमणुक | सिक रजेचा कालावधी | मंजुर रजा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ८ |
| १ | पोहवा/बियंचा | श्री. जी.एम.शेख | बिसंवि वाशिम | सिक रजा दि.४/४/२०१८ ते १५/०४/२०१८ पावेतो | दि.४/४/२०१८ ते १५/०४/२०१८ पावेतो परावर्तीत रजा मंजुर |

भाग -३ :- बढती/पगार:-निरंक

भाग -४ :- बक्षिस:-निरंक

भाग -५ :- शिक्षा/परवानगी :-निरंक

भाग -६ :- निलंबन/प्रशिक्षण व इतर :-

निलंबन :- निरंक.

प्रशिक्षण :-

आदेश क्रमांक पोअवा/आशा-४/प्रशिक्षण/नाशिक सत्र क्र.,१३०,१३१, /निवड मपोशि/२०१८/३०७३ वाशिम दिनांक ४/५/२०१८ अन्वये मा.अपर पोलीस महासंचालक म.रा.मुंबई यांचे आदेशान्वये प्राचार्य गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक यांचे पत्र क्रमांक/गुअप्रके /डीटीकोर्स/सेवा प्रशिक्षण सत्र क्र. १३०,१३१ नाशिक दि.२/५/२०१८.अन्वये सत्र क्र.१३०,१३१ हे दि.७/५/२०१८ पासुन गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक येथे आयोजीत करण्यात आलेले.सदरचे प्रशिक्षणा करीता खालील नमुद केलेले पो.स्टे.चे अधिकारी यांनी महिला पोलीस कर्मचा-यांची निवड करुन प्रशिक्षणास रवाना करावे.

| अ.क्र. | सत्र क्रमांक | निवड कर्मचारी | प्रशिक्षण कालावधि | विषय | प्रशिक्षण खर्च | गणवेष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १३० | १)जिवीशा वाशिम-०१ महिला २)महिला तक्रार नि.कक्ष-०१ ३)पो.स्टे.आसेगांव-०१ महिला पोलीस कर्मचारी. | दिनांक ०७/५/१८ ते १२/०५/२०१८ | आर्थीक गुन्हे तपास व बँक-फ्रॉड केसेस/प्लास्टीक कार्ड फ्रॉडर्स आणि पोलीस तपासात अंगुलीमुद्राचे महत्व | रु. १८४३/- (रु.एक हजार आठशे त्रेचाळीस फक्त) | साधा |
| २ | १३१ | १) जिवीशा वाशिम-०१,महिला २) पो.स्टे.अनसिंग-०१ महिला ३) पो.स्टे.जऊळका-०१ महिला पोलीस कर्मचारी. | दिनांक ०७/५/१८ ते १२/०५/२०१८ | न्यास सहाय्यक विज्ञान व न्याय वैद्यक शास्त्र व पोलीस तपासात अंगुलीमुद्राचे महत्व. | रु.१७३३/- (रु.एक हजार सातशे तेहत्तीस फक्त) | साधा |

क्रमांक/पोअवा/आशा-४/BDDS BASIC COURSE-५/निवड-पोकॉ-७७५/२०१८/३२९९ वाशिम दिनांक ४/५/२०१८ अन्वये मा.संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक MIA पुणे यांचे बिनतारी संदेश क्रमांक MIA/TRG/BDDS BASIC COURSE ०५/२०१८/८४० PUNE Dt.०९/०५/२०१८ अन्वये अन्वये इंटेलीजन्स अकॅडमी MIA पुणे द्वारा आयोजीत BDDS BASIC COURSE चे प्रशिक्षण दिनांक दि.२८/५/२०१८ मे ८/६/२०१८ या कालावधित आयोजित करण्यात आलेले आहे.

२/- सदर प्रशिक्षणा करीता खालील नमुद पोलीस कर्मचारी यांची निवड करुन पाठविण्यात येत आहे.

१) पोकॉ/७७५ दशरथ ढोके नेमणुक पो.मु.वाशिम.

३/- निवड करण्यात आलेले पोलीस कर्मचारी यांनी नियंत्रणकक्ष (MIA) राज्य राखीव पोलीस बलगट क्र..१ कम्पांऊंड रामटेकडी ,हडपसर पुणे-२२ येथे दिनांक २७/५/२०१८ चे २०.०० वा पावेतो न चुकता हजर राहतील.

## इतर :-

क्रमांक पोअवा/आशा-४/प्रशिक्षण/धोरण/परीपत्रक/२०१८ ३०७१ वाशिम, दिनांक ४/५/२०१८ अन्वये मा.अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके म.रा.मुंबई यांचे परीपत्रक क्रमांक प्रशि-२/प्रशिक्षण धोरण/२०१८/१७९३/मुंबई दिनांक २०/०४/२०१८ अन्वये.

राज्यात कायदा आणि सुव्यवस्था राखणे तसेच बदलत्या सामाजिक आर्थिक परीस्थीतीत आणि विज्ञान व तंत्रज्ञान यामधिल झालेले बदल विचारात घेता या बदलांना सामोरे जाण्यासाठी राज्यातील पोलीस दल कार्यक्षम असणे आवश्यक आहे. या करीता शासनाच्या प्रशिक्षण धोरणा नुसार पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मुलभुत प्रशिक्षण तसेच सेवांतर्गत प्रशिक्षण देणे अनिवार्य आहे.

प्रशिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडुन राज्यातील, राज्या बाहेरील तसेच देशा बाहेरील प्रशिक्षणा संदर्भात अधिकारी/कर्मचारी यांचे नामनिर्देशन पाठविण्यासाठी सर्व पो.स्टे.ला पत्रव्यवहार केला जातो तथापी असे निदर्शनास आले आहे की ब-याच ठाणेदारांकडुन प्रशिक्षणासाठी नामनिर्देशन पाठविले जात नाही. तसेच नामनिर्देशित अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षणास हजर राहणेसाठी वेळेत कार्यमुक्त केले जात नाही. काहीवेळेस अधिकारी /कर्मचारी कोणतीही पुर्व सुचना न देता प्रशिक्षणास उपस्थित राहात नाही. सदरची बाब अतिशय गंभिर स्वरुपाची असुन प्रत्येक पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे.

तरी सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व ठाणेदार सर्व शाखा प्रमुख यांना सुचित करण्यात येते की प्रशिक्षण संचलनालयाकडुन पाठविण्यात येणा-या प्रशिक्षणा संदर्भातील पत्रव्यवहार/बिनतारी संदेशाचे गांर्भीय लक्षात घेऊन प्रशिक्षणा करीता मागविण्यात आलेल्या संख्येनुसार नामनिर्देशन विहीत वेळेत या कार्यालयास पाठविण्यात यावी. तसेच या कार्यालयाकडुन पारीत केलेल्या आदेशा नुसार नेमुन दिलेल्या संख्येनुसार अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षणा करीता न चुकता व कोणतेही कारण न दर्शविता रवाना करावे.त्याकरीता नामनिर्देशन अधिका-याची/ कर्मचा-याची सहमती घेणे आवश्यक नाही. तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षणास न चुकता उपस्थित राहतील याची दक्षता घेण्यात यावी.अन्यथा कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

(मोक्षदा पाटील)
पोलीस अधिक्षक वाशिम.

प्रति,
संगणक कक्ष प्रमुख पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांना माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीस संगणक विभाग नेटवर प्रसिध्दी देणे कामी.

२/- संगणक कक्ष प्रमुख यांनी सदरचे जिल्हा पोलीस गॅझेट अंक हे पोलीस अधिक्षक वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वा करीता उपलब्ध करुन देण्याात यावे.तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रमुख जिल्हा वाशिम यांचे संकेतस्थळावर "ई-मेल द्वारे" सर्व संबंधितांना माहितीस/सि.बी.-१ लिपीक यांना योग्य कार्यवाहीस.

*****************